
# दुष्ट आणि सर्व वाईट गोष्टींचा जगात कसा प्रवेश झाला

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू, आदामाच्या पापाप्रमाणे मुलांचे पाप त्यांना तुझ्यापासून बाजूला दूर घेऊन जाते, हा इशारा त्यांना मिळावा तसेच सर्वकाळ तुझ्या बरोबर राहण्यासाठी तुझ्याकडून मिळणाऱ्या पापक्षमेची गरज आहे हे समजावे याकरीता कृपा करुन ह्या अभ्यासाचा उपयोग करु घे.''



**उत्पत्ती अध्याय 3 मधून** आदाम व हव्वा ह्यांच्या अवज्ञेचा वृत्तांत मोठया मुलाने किंवा शिक्षकांनी वाचून दाखवावा किंवा सांगावा. यामध्ये सैतानाने सापाचे रूप घेऊन आदाम व हव्वा ह्यांना देवाची आज्ञा मोडण्याचा मोह कसा पाडला हे सांगितले आहे. देवाने तो पवित्र असल्यामुळे त्यांना आपल्या समक्षतेमधून हाकलून देऊन मरु दिले.



कथावृत्तांत्त सांगून झाल्यावर **पुढील प्रश्न विचारा** *(प्रत्येक प्रश्नापुढे उत्तरे लिहिले आहे).*

- देवाने फळ खाण्यास मनाई केली आहे हे हव्वेला कसे समजले? *(पाहा वचन 3)*
- हव्वेला फळ खाण्याची इच्छा व्हावी यासाठी सैतानाने काय खोटपणा केला? *(वचने 4-5)*
- आदामाने फळ का खाल्ले? *(वचन 6)*
- आदाम व हव्वेने त्यांच्या-त्यांच्या अवज्ञेचा दोष कोणाला दिला? *(वचने 12-13)*
- स्त्रीचे मूल सैतानाला काय करणार असे देवाने त्याला सांगितले? *(वचन 15)*
- हव्वेला काय शिक्षा होईल असे देवाने सांगितले? *(वचन 16)*
- आदामाला कोणती शिक्षा मिळणार असे देवाने सांगितले? *(वचन 17)*
- त्यांना बागेतील देवाच्या समक्षतेतून बाहेर का जावे लागले? *(वचने 22-24)*

उत्पत्ती 3 मधून मानवजातीच्या मूळ पापाच्या कथावृत्तांताचे **नाट्यीकरण करा.**

- मुलांना ही नाटिका सादर करता यावी याकरीता उपासनेच्या पुढाऱ्यांशी बोलून व्यवस्था. तुम्ही सर्व भूमिका केल्याच पाहिजेत असे नाही.
- मुलांकडून नाटिकेची चांगली तयारी करुन घ्या.
- **मोठया मुलांनी** किंवा प्रौढांनी **निवेदक, आदाम, हव्वा** (हातात एखादे झाडाचे मोठे पान ठेवा, **देवाची वाणी** आणि **सर्प** फळासारखे काहीतरी हातात ठेवा) ह्या भूमिका कराव्यात.
- लहान मुलांनी **प्राणी व देवदूत** (हातात 'तरवार' ठेवा) ह्या भूमिका कराव्यात.

**निवेदक :** उत्पत्ती 3:1-6 मधून कथावृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''आदामाने स्वर्गातील प्राण्यांना नावे दिली. प्राणी कसे चालतात पाहा.''

**प्राणी :** प्राण्यासारखे चाला, एकावेळी एक किंवा दोन मुलांनी चालावे. प्राण्यांचा आवाज काढा.

**आदाम :** प्रत्येक 'प्राण्याकडे' बोट दाखवा आणि कोणालाही विचारा, ''याला मी कोणते नाव देऊ?'' (ती व्यक्ती उत्तर देईल).

**निवेदक :** ''सैतानाने सर्पाचे रूप घेतले. तो काय म्हणाला ते ऐका.''

**सर्प :** मोठयाने फूत्कार टाकून म्हणा,'' हव्वाबाई, ऐका!'' (फूत्कार टाकून हव्वेसमोर फळ धरा) ''या बागेतील कोणतेही फळ खाऊ नका अशी देवाने आज्ञा दिली आहे ना?''

**हव्वा :** ''वा! हा साप काय सुंदर आहे!'' (फळाकडे बोट दाखवून)'' नाही! नाही! ते मध्यभागी असलेल्या झाडाचे फळ सोडून इतर कोणत्याही झाडाचे फळ खा असे देवाने सांगितले आहे. त्या झाडाचे फळ खाल्ले तर आम्ही मरुन जाऊ.''

**सर्प :** मोठयाने फूत्कार टाकून म्हणा, ''नाही, हव्वाबाई. तुम्ही मरणार नाही. उलट तुम्ही देवासारखे शहाणे व्हाल. पाप म्हणजे काय ते तुम्हांला समजेल!'' (विकट हास्य करा).

**हव्वा :** ''फळ तर मोठे सुंदर दिसते. पाप काय असते ते जाणून घेण्याची मला उत्सुकता लागली आहे. देवाने काहीही सांगू देत मला काय त्याचे. मी त्याची आज्ञा मोडून मला हवे ते खाणारच!''

**हव्वा :** फळ घेऊन त्यातील थोडे खाल्ल्याचा अभिनय करा आणि राहिलेले आदामाला द्या आणि म्हणा, ''आदाम! या हे सुंदर फळ खा.''

**आदाम :** ''हव्वा, देवाने हे फळ खाऊ नका असे सांगितले. पण तू खात आहेस तर मी ही आज्ञा मोडून खातो. वाईट काय आहे ते मलाही जाणून घ्यायचे आहे.''

**सर्प :** हासून फूत्कार टाका आणि म्हणा, ''तुम्ही देवाची आज्ञा मोडण्याचे ठरवले. आता तो तुम्हांला कायमचे त्याच्यापासून दूर हाकलून देईल!'' (फूत्कार टाकीत हसा).

**निवेदक :** उत्पत्ती 3:7-13 मधून कथावृत्तांत्ताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''आदाम काय म्हणतो ते ऐका.''

**आदाम :** ''हव्वा! आपण हे काय केले ? आपण देवाची आज्ञा मोडली! मी उघडा पडलो आहे!''

**हव्वा :** ''हे पाहा ही मोठी अंजिराची पाने आहेत. ती एकत्र शिवून मी आपल्यासाठी कपडे तयार करते''

**देवाची वाणी :** मोठयाने म्हणा, ''आदाम! आदाम! तू कोठे आहेस? चला आपल्याला हया बागेत फेरफटका मारायचा आहे ना, जिला मी तुमच्या आनंदासाठी निर्माण केले आहे मी आलो आहे!''

**आदाम :** ''मला भीती वाटते कारण मी नग्न आहे. म्हणून मी लपून बसले आहे.''

**देवाची वाणी :** ''तुम्ही नग्न आहात हे तुम्हांला कोणी सांगितले? तुम्ही ते खाण्यास मनाई केलेले फळ खाल्ले का?''

**आदाम :** ''हव्वाने ते मला दिले.''

**हव्वा :** ''सर्पाने मला खोटे सांगितले. हे फळ आमच्यासाठी चांगले आहे असे तो म्हणाला!''

**निवेदक :** उत्पत्ती 3:14-24 म्हणून कथावृत्तांत्ताचा तिसरा भाग सांगून म्हणा, ''देवाने आदाम व हव्वा ह्यांच्यासाठी प्राण्याच्या कातडयाचे कपडे शिवले. देव काय म्हणाला ते ऐका.''

**देवाची वाणी :**''सर्पा, तू पोटाने मातीत चालशील, हव्वेची संतती तुझे डोके फोडील. हव्वा, तू माझी आज्ञा मोडलीस, तुला मुलांना जन्म देताना प्रचंड वेदना होतील. आदाम, तुला अन्नासाठी पुष्कळ कष्ट करावे लागतील. जा. तुम्हांला आता ह्या बागेत माझ्याबरोबर राहता येणार नाही.''

**देवदूत :** आदामाच्या दिशेने तरवार उगारुन म्हणा, ''तुम्ही देवाची आज्ञा मोडली. तुम्हांला येथे आता देवाच्या सान्निध्यात राहता येणार नाही.''

**निवेदक :** नाटिकेसाठी मदत करणाया प्रत्येकाचे आभार माना आणि ऐकून घेतल्या बद्दल मोठया माणसांचेही आभार माना.

**प्रश्न :** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसाठी सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी मोठया माणसांना विचारावेत.



**उदाहरण :** एका मुलाकडे मोठे पोते असते. तो निरनिराळया लोकांकडे जाऊन विचारतो, ''ह्या पापाच्या ओझ्यापासून मला कोण सोडवेल?'' (त्यांना उत्तर देऊ द्या). हातात सुरी घेतलेला मुलगा म्हणतो, ''ही प्रभूची तरवार देवाचे वचन आहे. ते आपल्याला सांगते की, येशूचे रक्त आमची पापे धुऊन टाकते'' (त्या पोत्याचे दोर सुरीने तोडा म्हणजे पोते खाली पडेल).

मुलांना, सापाचे किंवा फळाचे चित्र काढायला सांगा. हे चित्र मुले पुढच्या उपासनेच्या वेळी मोठया माणसांना दाखवून सैतान आम्हांला कसे मोहात पाडतो याचे स्पष्टीकरण करतील.

लहान मुलांनी रोम 3:23 तर मोठया मुलांनी रोम 5:12 हे वचन **पाठ करावे, चर्चा.** ''आज, लोक कोणत्या मार्गाने देवाची आज्ञा मोडतात?'' हे मुलांना विचारा.

**कविता :** तीन मुलांना स्तोत्र 53:1-3 ह्यातून प्रत्येकी एक वचन म्हणायला सांगा.

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू, आम्ही अनेकवेळा तुझी आज्ञा मोडली आहे. आम्ही सैतानाचे गुलाम झालो. शत्रूचे डोके फोडून आम्हांला स्वतंत्र करण्यासाठी तू येशूला हव्वेच्या संततीला, पाठवलेस म्हणून उपकार मानतो''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net